**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ३१ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्याच्या पहिल्या 'महिला उपमुख्यमंत्री' म्हणून सुनेत्रा पवार यांचा शपथविधी संपन्न.**
2. **देशभरात २५ कोटींहून अधिक मृदा आरोग्य कार्डांचं वाटप.**
3. **नागपूरात दोन दिवसीय 'ऑरेंज सिटी आरोग्य फिल्म फेस्टिव्हल'चं उद्घाटन.**

**आणि**

4. **भारत न्यूझीलंड ट्वेंटी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला शेवटचा सामना आज तिरुअनंतपुरम् इथं रंगणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

सुनेत्रा अजित पवार यांनी आज महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. लोकभवन इथल्या दरबार हॉलमधील छोटेखानी कार्यक्रमात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपस्थित होते.....

सुनेत्रा पवार या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या त्यांच्या जागी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. तत्पूर्वी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवून दिला. त्यानंतर, मुंबईतील विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. तसंच पक्षाबाबतचे निर्णय घेण्याचे सर्वाधिकारही त्यांच्याकडे सोपविण्यात आले. विधानभवनातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या बैठकीत एकमतानं हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीनंतर तातडीनं राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी वर्षा निवासस्थान गाठत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत पक्षानं केलेल्या ठरावाची माहिती दिली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री पदी नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला. पाठोपाठ लोकभवनात

छोटेखानी शपथविधी सोहळा पार पडला आणि सुनेत्रा पवार या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री बनल्या. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून कार्यकाळ सुरू करणाऱ्या  सुनेत्रा पवार यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहे. मला विश्वास आहे की त्या राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी अथक परिश्रम करतील आणि दिवंगत अजितदादा पवार यांचे स्वप्न पुढे नेतील असंही ते पुढं म्हणाले.

बाल्या (नरेंद्र) बोरकर

नागपूर महानगरपालिकेच्या सत्तापक्ष नेतेपदी ज्येष्ठ नगरसेवक बाल्या ऊर्फ नरेंद्र बोरकर यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. महापालिकेच्या कामकाजाचा मोठा अनुभव आणि जनसंपर्काच्या बळावर पक्षानं बोरकर यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

मृदा आरोग्य कार्ड

देशभरात आतापर्यंत २५ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्डांचं वितरण करण्यात आलं आहे. मातीचं आरोग्य आणि दर्जा राखण्याच्या उद्देशानं केंद्र शासनानं मृदा आरोग्य कार्ड योजना २०१५ मध्ये सुरू केली. गेल्या वर्षी २०२५ मध्ये देशभरात या योजनेच्या जनजागृतीसाठी ९३ हजारांहून अधिक शेतकरी प्रशिक्षण आणि सहा लाखांहून अधिक प्रत्यक्ष बांधांवर प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आले. त्याचा चांगला परिणाम दिसून आल्याचं कृषी विभागानं म्हटलं आहे.या योजनेअंतर्गत प्रत्येक दोन वर्षांनंतर मातीचं परीक्षण करून शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्डच्या माध्यमातून त्यांच्या शेतातील मातीचा दर्जा आणि पोषकता याबाबत माहिती दिली जाते.

साखर उत्पादन

राज्यातल्या साखर उत्पादनात यंदाच्या हंगामात ४२ टक्क्यांनी वाढ झाली असून महाराष्ट्र देशातलं साखर उत्पादनातलं अग्रणी राज्य ठरलं आहे.  राज्यात २०२५-२६ या चालू हंगामात ३१ जानेवारीपर्यंत ७८ लाख ७० हजार टन साखरेचं उत्पादन झाल्याची माहिती भारतीय साखर आणि जैव-ऊर्जा उत्पादक संघटनेनं दिली. गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर कारखान्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे. राज्यात सध्या २०६ साखर कारखाने आहेत. गेल्या  वर्षी ही संख्या १९० होती. देशाचं साखर

उत्पादन चालू हंगामात १८ पूर्णांक ३५ शतांश टक्क्यांनी वाढून एक कोटी ९५ लाख टनांवर पोहोचलं आहे. गेल्या हंगामातलं उत्पादन १ कोटी ६० लाख टन इतकं होतं. ऑक्टोबर ते सप्टेंबर हा साखरेचा हंगाम असतो. देशात ५१५ साखर कारखाने आहेत. मागील वर्षी ही संख्या ५०१ होती.

सेवा अनिवार्य

भारतीय पोलीस सेवेतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना केंद्र सरकारची दोन वर्षं सेवा अनिवार्य करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक आणि उपमहानिरीक्षक पदासाठी अर्हताप्राप्त अधिकाऱ्यांना हा नियम लागू होईल, असं केंद्रीय गृहमंत्रालयानं यासंदर्भात सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. २०११ च्या तुकडीपासून हा नियम लागू होईल.

नीट पीजी

पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश अर्थात नीट पीजी प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी सुरू झाल्याची माहिती आरोग्य सेवा महासंचालनालयानं समाजमाध्यमाद्वारे दिली आहे. पुन्हा सुरू झालेल्या या समुपदेशन प्रक्रियेत नवी नोंदणी सुविधा उपलब्ध असणार आहे. अतिरिक्त जागांचाही समावेश करण्यात आला असल्यानं विद्यार्थ्यांना अधिक संधी असल्याचंही या पोस्टमध्ये म्हटलं आहे. विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेत सहभागी होऊन त्यांचे पसंतीक्रम द्यावेत, असं आवाहन महासंचालनालयानं केलं आहे. अधिक माहिती वैद्यकीय समुपदेशन समितीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
'ऑरेंज सिटी आरोग्य फिल्म फेस्टिव्हल'

नागपूर इथं दोन दिवसीय 'ऑरेंज सिटी आरोग्य फिल्म फेस्टिव्हल'चं थाटात उद्घाटन पद्मश्री डॉ. अभय बंग यांच्या हस्ते आज झालं. आजारी पडू नये यासाठी जीवनशैलीवर लक्ष देणं म्हणजेच खरं 'आरोग्य स्वराज्य' असल्याचं डॉ. बंग यांनी सांगितलं.चित्रपटांच्या माध्यमातून प्रत्येकानं आपल्या आयुष्याची 'आरोग्याची फिल्म' घडवावी, असं आवाहन त्यांनी केलं. या फेस्टिव्हलमध्ये कर्करोग, मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती, पर्यावरण आदी विषयांवरील 22 लघुपट प्रदर्शित करण्यात आले. युवकांमध्ये सामाजिक भान निर्माण करण्यासाठी चित्रपट हे प्रभावी माध्यम असल्याचं आयोजकांनी नमूद केलं.
पंकज भोयर

भंडारा जिल्ह्यातील कोच्ची (ता. लाखांदूर) इथं जिल्हास्तरीय शालेय क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सवाचं थाटात उद्घाटन झालं. पालकमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि मशाल प्रज्ज्वलन करून या त्रि-दिवसीय महोत्सवाची सुरुवात झाली. शिक्षकांमुळेच विद्यार्थी आणि शाळा आदर्श घडू शकतात, असं प्रतिपादन पंकज भोयर यांनी यावेळी बोलताना केलं. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सेमी-इंग्रजी आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचं शिक्षण उपलब्ध होत असल्याचं त्यांनी सांगितलं. कार्यक्रमास आ. नाना पटोले, खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुस्तक प्रकाशन

आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे ज्येष्ठ विचारवंत आणि लेखक ताराचंद खांडेकर यांच्या चार पुस्तकांचा प्रकाशन सोहळा उद्या सायंकाळी 5 वाजता उत्तर नागपुरातील राजाभाऊ खोब्रागडे सभागृह सिद्धार्थनगर इथं आयोजित करण्यात आला असून या प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्राध्यापक डॉ. वसंत शेंडे राहतील, तर ज्येष्ठ नाटककार डॉ. प्रेमानंद गज्वी, प्राध्यापक डॉ. सुरेश मेश्राम, प्राध्यापक डॉ. शैलेंद्र लेंडे हे या पुस्तकावर भाष्य करतील.

टी-ट्वेंटी

भारत आणि न्यूझीलंड दरम्यानच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आज संध्याकाळी सात वाजता तिरुअनंतपुरम इथं खेळला जाईल. भारतानं यापूर्वीच मालिकेत विजयी आघाडी घेतली आहे. दरम्यान, येत्या सात फेब्रुवारीपासून टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

हवामान

देशाच्या उत्तर भागात पश्चिमी वारे आणि हिमालयीन प्रदेशातली हिमवृष्टीयामुळे अजूनही थंडीचा जोर आहे. जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधे जोरदार हिमवृष्टी होत आहे. बर्फ साचल्याने रस्ते बंद झाले आहेत. जनजीवन विस्कळीत झालं आहे. मध्य प्रदेशात दाट धुकं आहे. उत्तर भागात वादळी पावसाची शक्यता आहे.राज्यात हवामान ढगाळ आहे. विदर्भात थंडीचा जोर ओसरला आहे. आज नागपुरात १४.६दशांश अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

## सुरक्षा प्रणाली

भारतीय रेल्वेनं काल आपल्या रेल्वेजाळ्याच्या तीन भागांत कवच या सुरक्षा प्रणालीच्या चौथ्या टप्प्यातल्या ४७२ किलोमीटर लांबीच्या मार्गाचा प्रारंभ केला. यात पश्चिम रेल्वे विभागातील ३४४ किलोमीटरचा वडोदरा ते विरार, उत्तर विभागातील ३५ किलोमीटरचा तुगलकाबाद जंक्शन ते पलवल आणि पूर्व मध्य विभागातील ९३ किलोमीटरहून अधिक लांबीचा मानपूर ते सरमतनार या रेल्वेमार्गांचा समावेश आहे. १ महिना आणि १ दिवसात कवच प्रणाली स्थापित करण्यात आलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा लोहमार्ग आहे. या प्रणालीमुळे भारतीय रेल्वेच्या पाच मार्गांवर एकूण सुमारे १ हजार ३०० किलोमीटरच्या रेल्वेमार्गांवर कवच सुरक्षा प्रणाली कार्यान्वित झाली आहे.

## निपाह

भारतात निपाह या रोगाचा प्रसार होण्याचा धोका नगण्य असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं स्पष्ट केलं आहे. हा धोका कमी असल्यामुळे भारतात प्रवास किंवा व्यापारावर प्रतिबंध घालण्याची आवश्यकता नसल्याचंही संघटनेनं म्हटलं आहे. पश्चिम बंगालमध्ये दोन जणांना निपाह या रोगाचं संक्रमण झाल्याचं आढळल्याच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेनं ही प्रतिक्रिया दिली आहे. भारतीय आरोग्य अधिकाऱ्यांसमवेत जागतिक आरोग्य संघटना यावर काम करत असून निपाहचा प्रसार मानवाकडून मानवाकडे होत असल्याचा कोणताही पुरावा अद्याप मिळाला नसल्याचं संघटनेनं स्पष्ट केलं आहे.निपाह हा रोग पशुजन्य असून वटवाघळांच्या माध्यमातून माणसाला होऊ शकतो आणि खराब झालेल्या अन्नाच्या माध्यमातून याचा प्रसार होतो.

******